सण अग्रिम मंजूरी -
डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा समावेश करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांकः अग्रिम-२०१७/प्र.क्र.१२/२०१७/ विनियम
मादाम कामा रोड, राजगुरु हुतात्मा चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
तारीख: १८ मे, २०१७

वाचा :

१) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, क्र.एफएनडी-१०६२-बी, दि.०६.१२.१९६२.
२) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग संकीर्ण-१०.०१/१४७०/प्र.क्र.१३/२००२/२९, दि.२९.०१.२००२.
३) शासन निर्णय वित्त विभाग, क्र.अग्रिम-२०१५/प्र.क्र.५७/१५/विनियम, दि.२६.१०.२०१५

प्रस्तावना :

संदर्भाधीन अ.क्र.१ येथील दिनांक ०६.१२.१९६२ च्या परिपत्रकान्वये सामान्य प्रशासन विभागाने राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना ०९ महत्वाच्या सणांना अग्रिम मंजूर करण्याचे आदेश दिले आहेत. संदर्भाधीन अ. क्र.२ येथील दिनांक २९.०१.२००२ च्या शासन परिपत्रकान्वये महत्वाच्या सणांच्या यादीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा समावेश करण्यात आलेला आहे. संदर्भाधीन क्र.३ येथील दिनांक २६.१०.२०१५ च्या शासन निर्णयान्वये वित्त विभागाने अराजपत्रित राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना संदर्भाधीन क्र.१ च्या शासन परिपत्रकान्वये घोषित करण्यात आलेल्या ९ महत्वाच्या सणांकरीता मुंबई वित्तीय नियम १९५९ मधील नियम क्र.१४२(जे) अनुसार देण्यात येणाऱ्या सण अग्रिमाची रक्कम रु.१०,०००/- केली आहे. सण अग्रिम डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीसाठी अनुज्ञेय करण्याकरीता शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे.

शासन निर्णय

शासन आता असे आदेश देत आहे की, वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र.३ येथील दिनांक २६.१०.२०१५ अन्वये अनुज्ञेय करण्यात आलेले रु.१०,०००/- सण अग्रिम डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीसाठी अनुज्ञेय राहील.

२. सण अग्रिम मंजूरी आणि वसूलीच्या अटी व शर्ती पूर्वी विहित केल्याप्रमाणेच राहतील.

३. मुंबई वित्तीय नियम १९५९ मधील नियम क्रमांक १४२(जे) मध्ये योग्य ती सुधारणा यथावकाश करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेताक २०१७०५१८१५०३५०६३०५ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anudeep Shrinivas Dighe

Digitally signed by Anudeep Shrinivas Dighe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=75f50c6671abf79e06e7d05c1f27cdae17ad6b94 7f5b0d740fa705320bede741, cn=Anudeep Shrinivas Dighe
Date: 2017.05.18 15:08:12 +05'30'

(अ. श्री. दिघे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

20 MAY 2017

जा.क्र.विकाओ/आस्था/२०१६/२०८८
दिनांक :- 5 JUN 2017

प्रति,
प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय / शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,औरंगाबाद
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन,औरंगाबाद, जालना,अंबड,जिंतूर,हिंगोली,नांदेड,उस्मानाबाद, बीड
पु.ला.शा.तं.लातूर,.म.तं.नि.लातूर

यांना कळविण्यात येते की, उपरोक्त शासन निर्णयानुसार महत्वाच्या सणांच्या यादी मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीसाठी सण अग्रिम मंजुरी बाबतचा समावेश करण्यात आला असून सदर शासन निर्णयाची प्रत आपल्या संस्था/कार्यालयातील कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून दयावी.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रतः- या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना माहितीस्तव तसेच सदरचे पत्र या कार्यालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी